प्रति ,

मा.जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त कार्यालय पुणे

यांना सविनय सादर,

**प्रतिवेदक :-** व्ही.एस.मिसाळ, पोलीस उप-निरीक्षक , खडक पोलीस ठाणे,पुणे.

यांना सविनय सादर की,

**विषय :-** अपहृत अल्पवयीन मुलाचा शोध होणेकरीता वर्तमानपत्रात फोटो प्रसारित होणेबाबत.

संदर्भ – खडक पोलीस ठाणे पुणेशहर जा.क्र १३३२/२०१९ दि.२३/०२/२०१९ रोजी अन्वये.

महोदय ,

उपरोक्त विषयान्वये सविनय सादर की, खडक पोलीस ठाणे गुन्हा रजि.नं.११७/२०१९ भा.दं.वि. कलम ३६३ मधील फिर्यादी अशोक बाबूराव शेरे वय-५० वर्ष धंदा- मजुरी रा. ५४/२९ जी. बाबू मामडी चौक समोर श्रमवीर मित्र मंडळ समोर लोहिनगर पुणे. यांचा मुलगा दिपक अशोक शेरे वय-१० वर्ष हा दि.१४/०२/२०१९ रोजी सायंकाळी १६/३० वा. खेळायला जातो असे सांगून राहते घरातून निघुन गेला तो अद्याप पर्यंत घरी आला नसून त्यांचा फिर्यादी यांनी सर्वत्र शोध घेवून ही तो मिळून न आल्याने मुलगा दिपक यास कोणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणास्तव फुस लावूण पळवून नेले असलेबाबत फिर्यादी यांनी तक्रार दिल्याने वरील प्रमाणे गुन्हा दाखल आहे. दाखल गुन्ह्यातील अपहृत अल्पवयीन मुलाचे वर्णन खालील प्रमाणे.



दिपक अशोक शेरे वय-१० वर्ष धंदा- शिक्षण रंगाने गोरा, चेहरा-गोल,केस काळे बारीक, नाक - सरळ, नेसणीस हिरव्या रंगाचा टि- शर्ट, निळ्या रंगाचे हाफ पॅन्ट, पायात चप्पल नाही, शिक्षण ४ थी पर्यंत मराठी भाषा बोलतो, जवळ पैसा अडका मौल्यवान चीज वस्तु काही नाही.

**येणे प्रमाणे वरील वर्णनाचे अपहृत अल्पवयीन मुलाचा शोध होणेकामी वरील संदर्भान्वये सर्व वर्तमानपत्रात फोटो प्रसारीत होणे बाबत विनंती रिपोर्ट दिला होता परंतू सदर महिती व फोटो कुठल्याही वर्तमानपत्रात प्रसारीत झालेले नाहीत. तरी वरील वर्णनाचे अपहृरत मुलाचा फोटो व माहिती वर्तमान पत्रात प्रसारीत होणेस विनंती आहे.**

**संपर्क- मो- ०२०-२४४५२०९५, खडक पोलीस ठाणे पुणे.**